# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
## पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.


## प्रेस नोट

दिनांक 05/10/2021 (मंगळवार)
(सायंकाळ)

---

### दरोडा घालण्याच्या तयारीत असलेल्या आरोपीतांना अटक

पो.स्टे. काटोल :– अंतर्गत 03 कि.मी अंतरावरील गळपुरा चौक काटोल येथे दिनांक 04/10/2021 चे 02.10 वा. ते 02.20 वा. दरम्यान नाईट ऑफिसर पोउपनी श्री आगासे यांना 2 मोपेड स्कुटरवर एकुण 5 संशयीत इसम दिसल्याने त्यांना हात दाखवुन थांबविले असता त्यांच्या दोन्ही मोपेड वाहनाची तपासणी केली असता ॲक्टिवा मोपेड स्कुटर क्रमांक एम.एच–40/सि.एफ–7772 वर ट्रिपल सिट बसलेले होते. तसेच ॲक्टिवा मोपेड स्कुटर क्रं. एम.एच.49/ एएस– 8899 वर डबल सिट बसलेले होते. सदर आरोपी क्र. 1.अतुल हनुमान कंगाले वय 19 वर्ष. 2. नागेश लालचंद खोटांगले वय 26 वर्ष 3. कुणाल सुनिल कन्हेरे वय 19 वर्ष 4. संकेत प्रेमराव भालेराव वय 19 वर्ष व 5. आकाश राजु मानकर वय 18 वर्ष यांच्या मोपेड स्कुटरची कागदपत्रे तसेच त्यांचे नावाची ओळख पत्रे दाखविण्यास सांगितले असता त्यांचाकडे कुठल्याही प्रकारची कागदत्रे नसल्याचे पाचही आरोपीने सांगितले त्यामुळे त्यांचेवर संशय निर्माण झाला व त्यांची नावे कोर्ट चेकरचे ॲपवर चेक केली असता त्यातील तिन आरोपी वर गुन्हे दाखल असुन त्यांचे ताब्यातील एका ऍक्टिवाचे डिक्कीतुन एक मोठा लोखंडी मुठीचा व समोरून धारदार टोक असलेला काळपट रंगाचा चाकु मिळुन आला. यातील पाचही आरोपीतांनी रात्रीचे अंधारात चोरी किंवा जबरी चोरी करण्याचे उददेशाने त्यांचे ताब्यातील ॲक्टिवा मोपेड स्कुटरचे डिक्कीत एक मोठे लोखंडी हत्यार ठेवुन संशयीत रित्या रोडने येतांना मिळुन आले.

सदर प्रकरणी फियादी पोहवा श्रीनिवास वाघ पो.स्टे. काटोल यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. काटोल येथे आरोपीतांविरुध्द कलम 401, 34 भादंवि. सहकलम 4, 25 शस्त्र अधिनियम कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनी आगासे मो.नं. 8446283925 हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर